| MHKO130006292023 | नियमित दिवाणी दावा क्र. ९७/२०२३<br>बापू ज्ञानू भोपळे वि. बाबू बंडू पोवार इ. ११ |
|---|---|

## निशाणी क्र. ०५ खालील आदेश.

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी दावा मिळकतीची विक्री अगर अन्य मार्गाने तबदिली करु नये म्हणून दावा मिळकतींचा कब्जा वादी यांना मिळेपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचेविरुध्द अंतरिम तुर्तातूर्त मनाई मागण्याकरीता दाखल केला आहे.

०२. वादीने प्रस्तुतच्या अर्जामध्ये दावा मिळकतीचे विस्तृत वर्णन केले आहे. वादींचे कथनानुसार दावा मिळकती या मूळच्या रामा तातोबा भोपळे यांच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती होय. सदर रामा भोपळे यांना लखू व ज्ञानू ही दोन मुले होय. सदर लखू यांना प्रतिवादी क्र. १२ नायकू हा मुलगा होय. तसेच, ज्ञानू यांना वादी बापू व मयत वसंत ही दोन मुले होय. सदर वसंत यांना प्रतिवादी क्र. १० व ११ ही दोन मुले आहेत. वर नमुद लखू व ज्ञानू यापैकी ज्ञानू हे जेष्ठ होय. दावा मिळकती या रामा तातोबा भोपळे यांच्या मृत्यूपश्चात वारसाने त्यांचे वारस वर नमूद लखू व ज्ञानू यांचेकडे आल्या. त्याचप्रमाणे लखू व ज्ञानू मयत झालेनंतर दावा मिळकतींची मालकी वारसाने वादी, प्रतिवादी क्र. १० ते १२ यांचेकडे आलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा दावा मिळकतींशी कोणताही, कसलाही संबंध नव्हता व नाही. प्रतिवादी क्र. १ ते ९ हे पोवार घराण्यातील असून त्यांचा वादी–प्रतिवादी क्र. १० ते १२ यांचे पूर्वहक्कदार रामा तातोबा भोपळे यांचे घराण्याशी कोणताही, कसलाही रक्तसंबंध अगर नातेसंबंध नव्हता व नाही. सदर प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ९ यांची आजी हिने रामा यांचे बरोबर दुसरा विवाह केला होता असे प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ९ बोलवून दाखवत असून त्यांचे वडील हे पोवार कुटूंबिय होय. त्यामुळे त्यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध अगर हक्क येत नव्हता व नाही. दावा मिळकती या वादी–प्रतिवादी क्र. १० ते १२ यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. त्यामुळे दावा मिळकतींची प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा कोणताही मालकी हक्क, हिस्सा अगर वहिवाट कधीही येत नव्हती व नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी बेकायदेशीरपणे महसूल खातेला हाताशी धरुन दावा मिळकतींचे कागदोपत्री स्वतःच्या

नावाच्या नोंदी करुन घेतलेल्या आहेत. तथापि, त्या नोंदीवरुन दावा मिळकतींची मालकी अगर कब्जेवहिवाट प्रतिवादी क्र. १ ते ९ यांना प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ यांनी स्वतःचे बेकायदेशीर नोंदीचा गैरफायदा घेवून दावा गट क्र. ३७६ चे ७/१२ पत्रकी स्वतःची मुले प्रतिवादी क्र. ४ व ५ यांची नावे बेकायदेशीरपणे नोंद करुन घेतलेली आहेत. दावा मिळकतींमधील प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा कब्जा पूर्णपणे विनामालकी, बेकायदेशीर आहे. दावा मिळकतींचा कब्जा राखून ठेवणेचा अधिकार प्रतिवादी क्र. १ ते ९ यांना नाही. यातील वादी यांनी वारंवार तसेच दि. १२/०५/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी त्यास नकार दिला व दावा मिळकतींची विक्री करुन टाकणार, त्यावर कर्जबोजे निर्माण करणार अशी धमकी वादी यांना दिली. त्यामुळे, वादी यांनी नाईलाजास्तव प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १० ते १२ यांना याकामी तांत्रीक अडचण येवू नये म्हणून त्यांना याकामी नाममात्र पक्षकार केलेले आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी दावा मिळकतींची विक्री अगर अन्य मार्गाने तबदिली करु नये व दावा मिळकतींचा कब्जा वादी यांना मिळेपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचेविरुध्द दावेचे अंतिम निकालापर्यंत तुर्तातूर्त मनाई करणेबाबत सदरचा अर्ज वादीने दाखल केला आहे.

**<u>प्रतिवादींची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–</u>**

**०३.** प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. २६ अन्वये दाखल केले असून, प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या कथनानुसार, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा गेली ५० वर्षांपासून प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट असून सदरचा कब्जा वादी यांना दाव्यामध्ये मान्य केलेला आहे. वादी यांनी महसुल खातेस पक्षकार करणे अभिप्रेत होते. सदर दाव्यास कायदयातील (Non joinder of Necessary Parties) ची बाधा निर्माण होते. या कारणास्तव देखील सदरचा दावा सद्यस्थितीत फोटाळण्यास पात्र आहे. दाव्यामध्ये वादी यांनी त्याचे दावा अर्जी कलम १ मध्ये त्यांचे मिळकतीच्या चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. तसेच वादी यांनी वादी यांच्या पूर्वजांची तथा प्रतिवादी क्र. १० ते १२ यांच्या पूर्वजांची दाव्यास समजुतीकरीता वंशावळ प्रस्तुत दाव्यामध्ये नमूद नाही. वादींनी याकामी त्यांच्या बहिणी तसेच लखू रामा भोपळे यांचे अन्य वारस मे.कोर्टात असून लपवलेले आहेत. यावरुन वादी यांचा दृष्ट हेतू दिसून येतो. तसेच त्यांना याकामी पक्षकार न केल्याने सदर दाव्यास Non joinder of Necessary Parties ची बाधा निर्माण होते. प्रतिवादी क्र. १ ते ९ यांची आजी हिने रामा बरोबर दुसरा विवाह केलेचे नमूद केलेले आहे. परंतु सदर विवाहाबाबतचा कोणताही पुरावा वादी यांनी याकामी हजर केलेला नाही तसेच द्वितीय पत्नीस

अथवा त्यांचे वारसास वाटणीचे अधिकार नसल्याचे वादी यांचे कथन चुकीचे आहे. वादी यांनी दावा मिळकतीच्या ७/१२ वरील नोंदी यापूर्वी याबाबत महसूल विभागाकडे तक्रार केल्याचे दिसून येत नाही. वादी यांनी सदरच्या दावा मिळकतीच्या ७/१२ वरील नोंदी चुकीच्या असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी हजर केलेला नाही. म्हणूनच वादी यांनी आजपावेतो महसूल विभागाकडे तक्रार केलेली नाही. वस्तुतः प्रतिवादी क्र. १ ते ९ यांची वर नमूद मिळकतीचे ७/१२ पत्रकी नावे कायदेशीररित्या लागलेली आहेत. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ९ हे त्यांचे कुटूंबियांसमवेत ब-याच वर्षांपासून वास्तव्यास आहेत. तसेच, प्रतिवादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचे वडील बंडू आप्पा पोवार यांचे नावाची नोंद वर नमूद मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नमूद होती तथा त्यांचे मृत्यूपश्चात सदर दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्या नावाची नोंद वारसा हक्काने झालेली आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

**०४.** वादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.केस्तीकर व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. पी.पी.हवलदार यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विधिज्ञ श्री. एस.एस.केस्तीकर यांनी युक्तीवादा दरम्यान खालील न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली:–

Shrikant R. Sankanwar & Ors. Vs. Krishna Balu Naukudkar 2003(2) Mh.L.J.

प्रतिवादी क्र. १ ते ९ चे विधिज्ञ श्री.पी.पी.हवलदार यांनी युक्तीवादा दरम्यान खालील न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली:–

Revanasiddappa & Anr. Vs. Mallikarjun & Ors. Supreme Court Civil appeal No. 2844 of 2011.

वर नमुद न्यायनिर्णयांचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

**०५.** अर्ज (नि. ५), म्हणणे (नि.२६), अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसे सहित मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी/सकृतदर्शनी केस आहे का ? | ....नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे का ? | ....नकारार्थी |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादींना अपरिमित हानी होईल का ? | ....नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | ....अर्ज (नि.५) नामंजूर करण्यात येतो. |

**– कारणमिंमासा –**

**मुद्दा क्र. १ ते ३ –**

**०६.** वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने अर्जातील वस्तुस्थितीची पुनरावृत्ती टाळण्याकरीता, वरील तिन्ही मुद्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे.

**०७.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा १) दावा मिळकत अ.नं.१(अ) मधील अ.नं.१ दावा मिळकत गट नं. ३७६ मधील दावा मिळकत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र. १ ते ५ व ८ ते ९ यांचेकडून मिळणेकरीता, तसेच २) दावा मिळकत अ.नं.१(अ) मधील अ.नं.२ दावा मिळकत गट नं. ३११ मधील दावा मिळकत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी नं. ६(अ) ते ६(ड) व ७ तसेच ८ ते ९ यांचेकडून वादी यांना मिळणेकरीता, ३) दावा मिळकत अ.नं. १(ब) मधील अ.नं. १ ते ४ यामधील दावा मिळकत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र. १ ते ३ व ६ ते ९ यांचेकडून वादी यांना मिळणेकरीता तसेच दरम्यानच्या उत्पन्नाबाबत स्वतंत्र चौकशीचा आदेश होण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने दावा मिळकतीची विक्री अगर अन्य मार्गाने तबदीली करु नये म्हणून प्रतिवादी नं. १ ते ९ यांच्याविरुध्द दावा मिळकतीचा कब्जा वादी यांना मिळेपर्यंत कायम मनाई आदेशाची मागणी केलेली आहे.

**०८.** प्रस्तुत अर्जात व दाव्यात नमुद केल्याप्रमाणे वादीने दावा मिळकत अ.नं १(अ) मधील मिळकतीचे ७/१२ उतारे, दावा मिळकत अ.नं १(ब) मधील मिळकतीचे मालमत्ता पत्रकाचे उतारे निशाणी ३ सोबत दाखल केलेले आहेत. तसेच प्रतिवादींनी गट क्र. ३७६ चा गाव नमुना ८–अ चा नमुना , ७/१२ उतारा, सि.स.नं. ४७१, ४७२, ४६७, ४६८ चे नकाशाच्या सत्यप्रती, ग्रामपंचायत लिंगनूर दु. यांचेकडील प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचे

असेसमेंट कर आकारणी यादी ची सत्यप्रत, ग्रामपंचायत लिंगनुर दु. यांचेकडील प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या वडीलांच्या नावाची कर यादी, प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्या नावाचा असेसमेंट उतारा, प्रतिवादी क्र. १ यांच्या नावाची कर पावती, प्रतिवादी क्र. १ यांचे नाव असलेला ४७१ चा भोगवटा पत्र, प्रतिवादी क्र. १ चे नाव असलेले डायरी उतारे हजर केलेले आहेत.

**०९.** वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकती या मुळच्या रामा तातोबा भोपळे यांच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती असून सदर रामा यांना लखू व ज्ञानू ही दोन मुले असून वादीने वादी व प्रतिवादी क्र. १० ते १२ यांच्या नातेसंबंधाबाबत उल्लेख केलेला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा दावा मिळकतींशी कोणताही कसलाही संबंध नसून दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १० ते १२ यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादीने प्रस्तुत दाव्यात दावा मिळकतींशी प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा कोणताही मालकी हक्क, हिस्सा अगर वहिवाट कधीही येत नसल्याचे कथन करुन प्रतिवादी क्र. १ ते ३ व ६ ते ९ यांनी बेकायदेशीरपणे महसूल खातेला हाताशी धरुन दावा मिळकतीच्या कागदोपत्री स्वतःच्या नावाच्या नोंदी केल्या असल्याचे कथन केलेले आहे. दाव्यातील कथनानुसार दावा मिळकतींचा कब्जा प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्याकडे असल्याचे दिसून येते व त्याबाबत त्यांच्याकडे कब्जाची मागणी केली असता प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी त्यास नकार देवून दावा मिळकतींची विक्री करुन टाकणार व त्यावर कर्जे बोझे निर्माण करणार अशी धमकी वादीला दिल्याने सदर दाव्यास कारण घडल्याचे दाव्यावरुन दिसून येते.

**१०.** प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी दाखल केलेले दाव्यास कैफियत व म्हणणे निशाणी क्र. २६ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा गेली ५० वर्षांपासून प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट असून सदरचा कब्जा वादी यांनी दाव्यामध्ये मान्य केलेले असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीने वादी यांची वंशावळ तसेच प्रतिवादी यांची वंशावळ देखील दाखल केलेली आहे.

**११.** प्रस्तुत अर्जान्वये वादीने प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी दावा मिळकतीची विक्री अगर अन्य मार्गाने तबदीली करु नये म्हणून व दावा मिळकतीचा कब्जा वादी यांना मिळेपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचेविरुध्द दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत तुर्तातूर्त मनाई आदेशाची मागणी केलेली आहे. वास्तविक पाहता, वादी यांनी दाखल केलेले दावा मिळकत अ.नं

१(अ) मधील गट नं. ३७६ व गट नं. ३११ चे उता–यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर उता–यांवर वादी सोबत इतर प्रतिवादी यांची देखील नावे नमुद आहेत. दावा मिळकत नगरभुमापन क्र. ४६७, ४७१, ४७२ च्या मालमत्ता पत्रकाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर उता–यावर हक्काचा मूळ धारक या सदरामध्ये प्रतिवादीचे पूर्वहक्कदार बंडू आप्पा पोवार यांच्या नावाचा उल्लेख असून वर्ष १९८४ तसेच वडीलार्जित याची देखील नोंद आहे. दावा मिळकत नगरभुमापन क्र. ४६८ च्या मालमत्ता पत्रकाचे अवलोकन केले असता सदर मालमत्ता पत्रकाच्या हक्काचा मूळ धारक सदरी प्रतिवादीचे पूर्वहक्कदार बंडू आप्पा पोवार यांच्या नावाची नोंद असून वर्ष १९८४ वडीलार्जित असे देखील नमुद आहे. एकंदरीत सदर नोंदीवरुन सदरच्या नोंदी सन १९८४ सालापासून असल्याबाबत प्रथमदर्शनी दिसून येते. वादीने दावा मिळकतीवरील प्रतिवादी यांच्या तसेच प्रतिवादीचे पूर्वहक्कदार बंडू आप्पा पोवार यांच्या नावाच्या नोंदीबाबत हरकत असल्याबाबत तक्रार केल्याबाबत कोणताही अर्ज दाव्यासोबत दाखल केलेला नसून त्याअनुषंगाने कोणतेही कथन केलेले दिसून येत नाही.

**१२.** प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने साक्षीदार कृष्णात बापू शिराळे, कृष्णात काळोबा तोडकर यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून सदर साक्षीदारांनी सदर प्रतिज्ञापत्रामध्ये प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये गेली ५० वर्षांपासून कब्जेवहिवाट करत असलेबाबत तसेच सदर मिळकती प्रतिवादी कोणासही तबदील करणार नसलेबाबत कथन केलेले आहे.

**१३.** प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा तसेच दावा मिळकतीच्या नकाशाची खरी नक्कल अभिलेखावर दाखल केलेली आहे. प्रतिवादीतर्फे प्रतिवादी क्र. १ ते ९ यांची असेसमेंट कर आकारणीची सन २००४ ते २००८ ची कर आकारणी यादी, सन १९९४–१९९५ ते १९९७–१९९८ कर आकारणी यादी, सन २०१२–२०१३ ते २०१४–२०१५ कर आकारणी यादी तसेच सन १९८०–१९८१ ते १९८४–१९८५ ची कर आकारणी यादी अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर कर आकारणी यादीवर प्रतिवादींचे वडील तसेच पूर्वहक्कदारांची नावे नमुद असलेली दिसून येतात. प्रतिवादींनी दाखल केलेल्या भोगवटापत्रावरुन असे निदर्शनास येते की, दावा मिळकतीच्या अनुषंगाने प्रतिवादींचे पूर्वहक्कदार बंडू आप्पा पोवार, वादींचे पूर्वहक्कदार लखु रामा भोपळे तसेच हौसाबाई ज्ञानू भोपळे यांची नावे सदर भोगवटापत्रावर नमुद आहेत. सदर नोंदणीच्या

अनुषंगाने प्रतिवादीने डायरी उता–याच्या प्रती देखील दाखल केलेल्या आहेत. सदर उता–यांवरुन असे निदर्शनास येते की, दावा मिळकत 'ब' मधील मिळकतीवर प्रतिवादींचे पूर्वहक्कदार बंडू आप्पा पोवार यांची धारक म्हणून नोंद झालेली आहे. प्रतिवादींतर्फे वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान झालेल्या वाटणीपत्राचा फेरफार नोंद क्र.६७८ ची प्रत देखील अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर प्रतींवरुन वादी व प्रतिवादी मध्ये दावा मिळकत 'अ' च्या अनुषंगाने झालेल्या वाटणीपत्राची नोंद सन २००२ साली घेण्यात आल्याचे दिसून येते. एकंदरीतच, सदर कागदपत्रांवरून तसेच दाव्यातील कथनांवरुन दावा मिळकती या प्रतिवादींच्या कब्जात असलेचे दिसून येते.

**१४.** दावा व प्रस्तुत अर्जातील कथनांनुसार दि. १२/०५/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ९ कडे वादी यांनी दावा मिळकतीच्या कब्जाची मागणी केली असता त्यांनी त्यास नकार देवून दावा मिळकतीची विक्री करुन टाकणार, त्यावर कर्ज बोझे निर्माण करणार अशी धमकी दिल्याने वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता, अभिलेखावरील कागदपत्रांवरुन असे निदर्शनास येते की, खुप वर्षांपासून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे पूर्वहक्कदार व प्रतिवादींची कब्जेवहिवाट सुरु आहे. दाव्यातील कथनांमध्ये देखील वादी हे दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादींकडून मागितलेला असल्याचे नमुद आहे. सकृतदर्शनी उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता असे निदर्शनास येते की, दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादींकडे असलेबाबत तसेच त्याबाबतची नोंद ब–याचवर्षांपासून सदर मिळकतींच्या उता–यांवर असलेबाबत वादींनी त्याअनुषंगाने तक्रार केल्याबाबत कोणताही तक्रार अर्ज अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**१५.** वादी, प्रतिवादी तर्फे दाखल उपरोक्त नमुद न्यायनिर्णयांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती व उपरोक्त नमुद न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती ही संपूर्णतः भिन्न व वेगळी असून प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद न्यायनिर्णयांचा आदर राखून सदर न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने लागू होत नाहीत.

**१६.** उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता असे निदर्शनास येते की, वादीने प्रथमदर्शनी दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १० ते १२ यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीचे असल्याबाबत तसेच प्रतिवादी क्र. १ ते ९ च्या सदर मिळकतींबाबत कोणताही मालकी हक्क, हिस्सा अगर वहिवाट कधीही येत नसलेबाबत तसेच त्यांचा कब्जा पूर्णपणे

विनामालकी बेकायदेशीर असलेबाबत सकृतदर्शनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव वादीला प्रथमदर्शनी केस नसल्याने सोईचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे तसेच मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादीला अपरिमित हानी होईल याबाबत वादीने सकृतदर्शनी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ ची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबतः–**

**१७.** मुद्दा क्र. १ ते ३ ची उत्तरे नकारार्थी देण्यात आलेली आहेत. त्यामुळे, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. अर्जाची वस्तुस्थिती लक्षात घेता खर्चासंबंधी कोणताही आदेश पारित करणे उचित राहणार नाही. सबब, मुद्दा क्र. ४ च्या उत्तराबद्दल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

## – आ दे श –

१. अर्ज (निशाणी क्र. ०५) नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

PRANITA SUHAS PATIL

Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2025.03.24 17:47:42 +0900

कागल (**श्रीमती प्रणिता एस.पाटील**)

दिनांक - २१/०३/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.